## अवाहन

जिल्हाधिकारी कार्यालय हे राज्य शासनाच्या सर्व जिल्हास्तरीय यंत्रणांशी समन्वयाचे काम करीत असते. म्हणजेच महसूल प्रशासन ही सर्व प्रशासकीय विभागांची जननी असून शासनाचा कणा आहे. जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करुन सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय कटिबध्द असते. नैसर्गिक आपत्ती व टंचाई याची झळ सर्वसामान्य जनतेस बसणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करणे, विविध विकास कामे मार्गी लावणे व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय घडवून आणणे, जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने जिल्हयातील सर्व निवडणुका जसे लोकसभा, विधान सभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निःपक्षपातीपणे पार पडतील याची दक्षता घेणे व नियंत्रण करणे, शासनाचे विविध विभाग व आयुक्त कार्यालयाशी समन्वय ठेवून विविध विकास कामांना गती देणे अशा स्वरुपाची कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय आस्थापित झालेले आहे.

ही सर्व कामे होत असताना शासकीय कामकाजाच्या बाबतीत अंमलबजावणी होताना काही कमतरता भासली तर आपण तक्रारी आणाव्यात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी तहसिल स्तरावर व जिल्हा स्तरावर लोकशाही दिनाचे आणि तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन जिल्हास्तरावर केले जाते. त्यामध्ये महिलांच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी महिला लोकशाही दिनाच्या दिवशी सकाळी १० वा. नोंदवाव्यात. त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे कायद्याच्या चौकटीत राहून निराकरण करण्यात येईल.

सर्व नागरिकांना मी अवाहन करतो की प्रत्येकाने कायद्याचे व नियमांचे पालन करावे. प्रत्येकाने कायद्यांप्रती आदर ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळेच चांगला व सभ्य समाज निर्माण होतो. त्यासाठी प्रत्येकाच्या मनात कायद्याविषयी व समाजातील प्रत्येक घटकाविषयी आदरभाव विकसित होणे गरजेचे आहे.

००००००